पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-९
सभावृत्तांत

दि.- ६/२/२०१३ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये दि.६/२/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग - अध्यक्षा
२) मा.आल्हाट मंदा उत्तम
३) मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.वाबळे संजय मल्हारराव
६) मा.मडिगेरी वर्षा विलास
७) मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
८) मा.सुपे आशा रविंद्र
९) मा.अजित दामोदर गव्हाणे
१०) मा.गोफणे अनुराधा देविदास
११) मा.गव्हाणे सुरेखा शंकर
१२) मा.महेशदादा किसन लांडगे
१३) मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१४) मा.विश्वनाथ विठोबा लांडे
१५) मा.ननवरे जितेंद्र बाबा
१६) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१७) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१८) मा.गायकवाड संध्या सुरदास
१९) मा.शेंडगे आशा सुखदेव
२०) मा.मोटे किरण बाळासाहेब
२१) मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्री. फुंदे डि.एम.-प्रभाग अधिकारी, श्री.रविंद्र जाधव-प्र.प्रशासन अधिकारी, श्री.दुधेकर – कार्यकारी अभियंता (स्थापत्य क-प्रभाग), श्री. कुदळे- कार्यकारी अभियंता विदयुत, श्री.इनामदार-लेखाधिकारी, श्रीम.पाठक-उपअभियंता जलनिस्सारण, श्री.जगताप-उपअभियंता स्थापत्य, श्री.घुले- उपअभियंता स्थापत्य, श्री.राणे-उपअभियंता स्थापत्य, श्री.पाटील-उपअभियंता (विदयुत), श्री.देशमुख- उपअभीयंता (विदयूत), श्री.काळे-उपअभियंता (पापु), श्री.बोत्रे- उपअभियंता (स्थापत्य/उदयान), श्री.शिंदे-उपअभियंता (पापु), श्री.दाते-प्र.सहा.आरोग्याधिकारी, श्री.क्षीरसागर-क.अभियंता झोनिपू-स्थापत्य.

सर्वप्रथम मा.अध्यक्षा यांनी सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात केली.

विषय क्रमांक १) दि. ०२/०१/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

तदनंतर खालीलप्रमाणे मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-२) मोशी प्रभाग क्र. ६ मध्ये पुणे नाशिक रस्त्यास जोडून श्री. क्षेत्र आळंदीकडे जाणा-या रस्त्यावर संत ज्ञानेश्वर व देहूकडे जाणा-या रस्त्याला (शिल्पासहीत) संत तुकाराम महाराज महाद्वार नावाने कमान उभारणेबाबत –मा.धनंजय आल्हाट व जितेंद्र ननावरे यांचे पत्र.

विषय क्रमांक-३) कलम २०५ अन्वये २० फुटी रस्ता घोषित करुन ताब्यात घेणेबाबत- मा.धनंजय आल्हाट व मा. यांचे पत्र.

विषय क्रमांक-४) प्रभाग क्र. ३१ मध्ये दिघी येथील रस्त्याना ठिकठिकाणी गतीरोधक बसविण्याबाबत- मा.आशा सुपे , मा.अनुराधा गोफणे व मा.मंदा आल्हाट यांचे पत्र.

विषय क्रमांक-५) वार्ड क्र. ६३ मधील ठिकठिकाणी दिशादर्शक फलक व माहिती फलक बसविणेबाबत- मा.किरण मोटे व मा.नितीन लांडगे यांचे पत्र

विषय क्रमांक-६) खराब पाण्याची लाईन बदलून मिळणेबाबत- मा. अनुराधा गोफणे, मा.मंदा आल्हाट व मा.आशा सुपे यांचे पत्र.

विषय क्रमांक-७) दापोडीतील रेल्वे उड्डाणपुलाखली सीमाभिंत बांधण्याबाबत- मा.राजेंद्र काटे व मा.संजय वाबळे यांचे पत्र

विषय क्रमांक-८) क प्रभाग समितीचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये महापुरुषांची छायाचित्रे लावण्याबाबत- मा.रमा ओव्हाळ व मा.संध्या गायकवाड यांचे पत्र

विषय क्रमांक-९) प्रभाग क्र. ३१ दिघी येथील रस्त्याना नाव देणेबाबत- मा.आशा सुपे व मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र.

----

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक- १३७ विषय क्रमांक- २
दिनांक- ६/२/२०१३ विभाग- स्थापत्य क
सुचक-मा.धनंजय आल्हाट अनुमोदक-मा.जितेंद्र ननवरे
संदर्भ- मा.धनंजय आल्हाट व मा. जितेंद्र ननवरे यांचे पत्र.

मोशी हे गाव तिर्थक्षेत्र देहु व आळंदी यांच्यामध्ये वसलेले गाव आहे. या तिर्थक्षेत्राकडे महाराष्ट्रातुनच नव्हे तर भारतातील काना कोप-यातुन भाविक येत असतात व त्यांना या दोन्ही तिर्थक्षेत्राकडे जाण्यासाठी मोशीमधुनच जावे लागते. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सांस्कृतिक वैभवात भर पडावी म्हणुन मोशीमधील देहुकडे जाणा-या रस्त्यावर श्री.संत तुकाराम महाराज प्रवेशद्वार (शिल्पासहीत) व आळंदीकडे जाणा-या रस्त्यवर श्री. संत ज्ञानेश्वर महाराज प्रवेशद्वार (शिल्पासहीत) या नावाने कमान उभारण्याकरीता चालु आर्थिक वर्षात तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १३८ विषय क्रमांक- ३
दिनांक- ६/२/२०१३ विभाग- नगररचना व विकास
सुचक-मा.धनंजय आल्हाट अनुमोदक-मा.अजित गव्हाणे
संदर्भ-मा.धनंजय आल्हाट यांचे पत्र.

मौजे मोशी येथील पुणे-नाशिक रस्त्यास जोडून गट क्र. ५०, ५१ आणि ५३ (नवीन) या गटामधुन पुर्वेकडे जाणारा २० फुटी (२५० मी.) रस्ता कलम २०५ अन्वये घोषित करुन ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १३९ विषय क्रमांक- ४
दिनांक- ६/२/२०१३ विभाग- स्थापत्य क प्रभाग
सुचक-मा.आशा सुपे अनुमोदक-मा.मंदा आल्हाट
संदर्भ-मा.आशा सुपे, मा.अनुराधा गोफणे व मा.मंदा आल्हाट यांचे पत्र.

दिघी प्रभाग क्र. ३१ मध्ये अंतर्गत रस्त्याने वाहनाच्या वर्दळीमुळे छोटे मोठे अपघात होत असतात त्यासाठी प्रभागातील नागरीकानी देखील लेखी स्वरुपात तक्रार अर्ज दिले आहे म्हणून अंतर्गत रस्त्याना गतीरोधक करणे आवश्यक आहे. तरी अंतर्गत रस्त्याना गतीरोधक करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक-१४० विषय क्रमांक- ५
दिनांक- ६/२/२०१३ विभाग- स्थापत्य
सुचक-मा.किरण मोटे अनुमोदक-मा.नितीन लांडगे
संदर्भ-मा.किरण मोटे व मा.नितीन लांडगे यांचे पत्र.

वॉर्ड क्र. ६३ मध्ये खाली ठिकठिकाणी दिशादर्शक फलक व माहिती फलक बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

१) जामा मजीद कासारवाडी
२) हनुमान मंदीर कासारवाडी
३) द्वारीकानगरीकडे जाणा-या रस्त्यास प्रजापिता ब्रम्हकुमारी नाव देणे
४) शिवप्रेमी चौक

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १४१ विषय क्रमांक- ६
दिनांक- ६/२/२०१३ विभाग- पाणीपुरवठा
सुचक-मा.अनुराधा गोफणे अनुमोदक-मा.आशा सुपे
संदर्भ-मा.अनुराधा गोफणे, मा.मंदा आल्हाट व मा.आशा सुपे यांचे पत्र.

प्रभाग क्रमांक ३३ मधील जुने पोस्टाजवळ चक्रपाणी वसाहत रोड गवळी चाळ येथे १५ दिवसांपासुन खराब, ड्रेनेजचे घाण पाणी एकत्रित येऊन दर्गंधीयुक्त घाणेरडा वास येतो आहे तरी सदरचे पाण्याची लाईन लवकरात लवकर बदलणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १४२ विषय क्रमांक- ७
दिनांक- ६/२/२०१३ विभाग- स्थापत्य क प्रभाग
सुचक-मा.राजेंद्र काटे अनुमोदक-मा.संजय वाबळे
संदर्भ-मा.राजेंद्र काटे व मा.संजय वाबळे यांचे पत्र.

दापोडी रेल्वे उड्डाणपुलाखाली सिमाभिंत बांधण्यासाठी रक्कम रुपये ३,००,०००/- (अक्षरी तीन लाख फक्त) तरतूद करणेत यावी. सदर ठिकाणी कच-याचे प्रचंड साम्राज्य माजले आहे त्याचप्रमाणे त्याठिकाणी अनधिकृत कामे जास्त वाढली आहेत. अनधिकृत झोपडया, पत्याचा अड्डा, जुगार, दारु पिण्याचे ठिकाण म्हणून मोठया प्रमाणावर वापर होत आहे.
त्यामुळे शेजारी असणा-या सोसायटीतील महिलांना जाणे येणे धोक्याचे झाले आहे. तरी त्याठिकाणी सिमाभींत करण्यात येवून ते पुर्णत: बंद करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक- १४३ विषय क्रमांक- ८
दिनांक- ६/२/२०१३ विभाग- स्थापत्य क
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक-मा.संध्या गायकवाड
संदर्भ-मा.रमा ओव्हाळ व मा.संध्या गायकवाड यांचे पत्र.

क प्रभाग समिती छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये खालील महापुरुषांची छायाचित्रे खालीलप्रमाणे बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

१) महात्मा ज्योतीबा फुले २) छत्रपती शाहू महाराज
३) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ३) लोकशाहीर आण्णाभाऊ साठे

सभागृहातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेच्या उजवीकडे महात्मा ज्योतीबा फुले यांची प्रतिमा, डावीकडे छत्रपती शाहू महाराज यांची प्रतिमा, समोरील बाहूस (पश्चिमेस) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची प्रतिमा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक-१४४ विषय क्रमांक- ९
दिनांक- ६/२/२०१३ विभाग-स्थापत्य
सुचक-मा.आशा सुपे अनुमोदक-मा.अनुराधा गोफणे
संदर्भ- मा.आशा सुपे व मा.अनुराधा गोफणे यांचे पत्र

प्रभाग क्र. ३१ दिघी येथील रस्त्याना नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.
आदर्शनगर मंगल केंद्राजवळ
१) विघ्नहर्ता कॉलनी
२) मातोश्री कॉलनी क्र. १
३) मातोश्री कॉलनी क्र. २
४) शिवनगरी गणेश मंदिर कॉलनी


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही /-
(मा.सुनिता (माई) पांडुरंग गवळी)
अध्यक्षा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कप्रस/कावि/२३७ /२०१३
दि. १/३/२०१३



प्र. प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.